**अतिरिक्त कार्यभासाठी अनुज्ञेय**
**अतिरिक्त वेतन / विशेष वेतनाच्या**
**दरात सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन निर्णय,क्रमांक : वेतन-२०००/प्र.क्र.५/सेवा-३,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक- २३ मे,२००६.

वाचा :- (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेतन-१३९०/प्र.क्र.२/९०/सेवा-८, दिनांक १० मे, १९९०,
(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक -वेतन-१३९०/प्र.क्र.६५/९०/ सेवा-३, दिनांक ४ डिसेंबर, १९९०,
(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक -वेतन-१४९१/प्र.क्र.१२८/९१/ सेवा-३, दिनांक २९ मार्च,१९९४,
(४) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक : वेपूर-१२९८/प्र.क्र.१३/९८/ सेवा- १०, दिनांक १० डिसेंबर १९९८.
(५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१.

**निर्णय**

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ५६ नुसार, शासकीय कर्मचा-याकडे त्याच्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आल्यास विशेष वेतन देय होते. वित्त विभागाच्या वरील अ.क्र. (१) येथील दिनांक १० मे १९९० च्या शासन निर्णयान्वये कर्मचा-याकडे दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आल्यास कर्मचा-यास अशा दुस-या पदाकरीता त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या १० टक्के दराने परंतु दरमहा रु.५०० इतक्या मर्यादेपर्यंत अतिरिक्त वेतन/विशेष वेतन अनुज्ञेय केले आहे. शासकीय कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत वित्त विभागाच्या वरील अ.क्र. (४) येथील दिनांक १० डिसेंबर १९९८ च्या अधिसूचनेन्वये सुधारणा करण्यात आली असून त्यासंबंधीचे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम १९९८ हे दिनांक १ जानेवारी १९९६ पासून अंमलात आले आहेत. दि.१० डिसेंबर,१९९८ च्या अधिसुचनेनुसार सुधारणा करण्यात आलेली वेतनश्रेणीतील सुधारणा विचारात घेऊन अतिरिक्त कार्यभारासाठी अनुज्ञेय अतिरिक्त वेतन / विशेष वेतनाच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. यासंदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

अ) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ५६ नुसार, शासकीय कर्मचा-याकडे स्वत:च्या पदाव्यातिरिक्त दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविल्यास अशा दुस-या पदाकरीता यापुढे त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या ५ टक्के दराने परंतु दरमहा रु.७५०/- एवढया मर्यादेपर्यंत, अतिरिक्त वेतन/विशेष वेतन अनुज्ञेय राहील.

ब) वरील नियमातील खंड (सी ) नुसार रु.१८,४०० व त्याहून अधिक किमान वेतन असलेल्या सुधारित वेतनश्रेणीमध्ये किंवा विस्तारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणा-या शासकीय कर्मचा-यांना अतिरिक्त वेतन /विशेष वेतन अनुज्ञेय होणार नाही.

क) महागाईभत्ता तसेच घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता देण्याच्या प्रयोजनार्थ सदर अतिरिक्त वेतन /विशेष वेतन यापुढेही विचारात घेतले जाणार नाही.

ड) एक वर्षाच्या कालावधीसाठी अतिरिक्त वेतन /विशेष वेतन मंजूर करण्याबाबत शासन निर्णय, वित्त विभाग, वेतन १४११/प्र.क्र.१२८/९१/सेवा-३, दिनांक २९.३.१९९४ अन्वये विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुखांना प्रदान केलेले अधिकार यापुढे खाली नमूद केलेल्या अधिका-याच्या बाबतीत वापरण्यात यावे :-

(१) ज्या पदाच्या वेतनश्रेणीतील किमान वेतन रु. १०,६५०/- हून कमी आहे अशा दुस-या गट-अ च्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणा-या त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली गट-अ चा अधिकारी (अखिल भारतीय सेवेतील अधिकारी वगळून)

(२) ज्या पदांच्या वेतनश्रेणीतील किमान वेतन रु. १०,६५०/- हून कमी आहे अशा गट-अ च्या पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणारा गट-ब चा अधिकारी.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेतन-१२८१/प्र.क्र.८४७/सेवा-७, दिनांक १९ फेब्रुवारी, १९८३ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ५६ खाली अतिरिक्त कार्यभारासाठी विशेष वेतन मंजूर करताना खालील तीन अटीची पुर्तता होत असल्याचे आदेशात प्रमाणित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. तथापि, काही वेळा या अटींची पूर्तता होत आहे वा कसे ही बाब विचारात न घेताच अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो. व त्यानंतर मंजूरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतो, असे निदर्शनास आले आहे. याबाबत पुन्हा स्पष्ट करण्यात येते की, अतिरिक्त कार्यभाराचा प्रत्येक प्रकरणी खालील तीन अटीची पुर्तता पूर्णत: होत असल्याची खात्री संबंधित कार्यालय प्रमुखांनी /प्रशासकीय विभागांनी करुन घेणे आवश्यक आहे :-

अ) ज्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असेल ते पद मुख्य पदास (कर्मचा-यांने धारण केलेल्या पदास) दुय्यम नसावे.

ब) कामात व जबाबदारीत विशिष्ट वाढ झालेली असावी.

क) दुसरे पद स्वतंत्र असून त्यास स्वतंत्र अधिकारीकरीता असावी.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेतन-१४९१/प्र.क्र.१२८/९१/सेवा-३, दिनांक २९ मार्च, १९९४ नुसार, पद प्रथम रिक्त झाल्यापासून एक वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी अतिरिक्त वेतन / विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख / प्रादेशिक विभाग प्रमुख यांना देण्यात आले आहे. पद प्रथम रिक्त झाल्यापासून दोन वर्षापर्यंतच्या कालावधीचे अतिरिक्त वेतन / विशेष वेतन मंजूर करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्यात आले आहेत. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर, २००१ मधील आदेशानुसार सहा महिन्यापेक्षा अधिक काळ रिक्त राहूनही व्यपगत न होणा-या पदांच्या बाबतीत हे अधिकार यापुढेही चालू ठेवण्यात यावेत. मात्र, सहा महिन्यापेक्षा अधिक काळ रिक्त राहिल्याने व्यपगत होणा-या पदांचा अतिरिक्त कार्यभार सहा महिन्यापेक्षा जास्त काळ सुरु ठेवता येणार नाही.

५. दोन वर्षापुढे अतिरिक्त कार्यभार सुरु ठेवावयाचा असेल अशा प्रकरणी दोन वर्षाच्या कालावधी संपण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाची पूर्वानुमती घेणे आवश्यक असल्याचे शासन निर्णय,वित्त विभाग, दिनांक २९ मार्च,१९९४ मधील परिच्छेद २ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. तथापि, काही वेळा संबंधित कार्यालयाच्या वा प्रशासकीय विभागाच्या स्तरावर दोन वर्षापुढे अतिरिक्त कार्यभार व्यवस्था चालू ठेवण्यात येते व त्यानंतर कार्योत्तर मंजूरीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येतात. याबाबत पुन्हा स्पष्ट करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची पुर्वानुमती न घेता अतिरिक्त कार्यभाराची व्यवस्था दोन वर्षापेक्षा जास्त काळ चालू राहिल्यास कार्योत्तर मंजुरीचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. यासंदर्भातील दि. २९ मार्च,१९९४ च्या आदेशातील तरतुदीचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत अधिका-याची राहील. दोन वर्षापेक्षा जास्त काळ अतिरिक्त कार्यभार चालू ठेवून विशेष वेतन मंजूर करणा-या अधिका-यांच्या विरुध्द जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही प्रशासकीय विभागांमार्फत होणे आवश्यक आहे.

६. हे आदेश दिनांक १.६.२००६ पासुन लागू होतील. ज्या कर्मचा-यांनी दिनांक १.६.२००६ च्या पूर्वीपासून अतिरिक्त कार्यभार सांभाळला असेल अशा कर्मचा-यांना, दिनांक १.६.२००६ पूर्वीच्या कालावधीसाठी संभाव्य वेतनावर असुधारित दराने विशेष वेतन देय होईल व दिनांक १.६.२००६ पासुन या आदेशातील तरतुदीनुसार सुधारित दराने विशेष वेतन देय होईल.

७. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ५६ व त्यामधील परिशिष्ट एक अ.क्र. १४ मधील याबाबतच्या विद्यमान तरतुदी या शासन निर्णयातील तरतुदीपुरत्या सुधारण्यात आल्या आहेत, असे मानण्यात यावे. या नियमात व परिशिष्टात यथावकाश सुधारणा करण्यात येतील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०५२२१५५३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**नसीमा म.शेख**
**शासनाच्या उप सचिव**

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव / उपमुख्यमंत्र्याचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री याचे खाजगी सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा) मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक लेखा निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/
नाशिक/अमरावती,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, सेवा-३, वित्त विभाग.

* पत्राने

---